# अध्यात्म विश्वविद्यालय
## (संक्षिप्त कार्यपरिचय आणि वैशिष्ट्ये)

### *अनुक्रमणिका*

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


*** संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन** **१०**

*** प्रस्तुत ग्रंथाची जाणवलेली सूक्ष्मातील वैशिष्ट्ये** **१४**

*** मनोगत** **१५**

**१. कार्य आणि उद्देश** **१७**

* साधकांची आध्यात्मिक उन्नती आणि जगभर धर्माचा प्रसार १७

* विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय साधून हिंदु धर्माचा प्रसार १८

**२. 'अध्यात्म विश्वविद्यालया'ची आवश्यकता** **१८**

* जगभरच्या मानवाची केविलवाणी सद्यस्थिती २०

* साधनेत प्रगती करण्यासंदर्भात हिंदूंची केविलवाणी स्थिती २०

**३. 'अध्यात्म विश्वविद्यालया'चे महत्त्व** **२३**

३ अ. भारताला पुनर्वैभव प्राप्त करून देणे २३

३ आ. हिंदु राष्ट्राचे दायित्व, तसेच धर्मसत्तेची धुरा सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे २३

**४. 'अध्यात्म विश्वविद्यालय' आणि प.पू. डॉ. जयंत आठवले** **२४**

* इतिहास आणि भविष्य २४

* 'अध्यात्म विश्वविद्यालया'ची स्थापना, हे अंतिम महत्त्वपूर्ण कार्य ! २८

**५. वास्तूचा आराखडा** **३३**

* विविध विभाग ३६

**६. शिक्षणाचे विषय** **३७**

* सर्व योगमार्गांचे शिक्षण ३७

* साधनेच्या दृष्टीकोनातून १४ विद्या व ६४ कला यांचे शिक्षण ३७

* समाज आणि राष्ट्र यांच्यासाठी उपयुक्त विषयांचे शिक्षण ४२

**७. शिक्षणाची वैशिष्ट्ये** **४३**

* शिक्षणामागील तत्त्वे ४३

* विद्यार्थ्यांच्या प्रकृतीनुसार साधनामार्ग असेल ! ४४
* प्रत्येक विषयाचे अध्यात्मीकरण करणे ४४
* कलेचा अभ्यास करण्यासह स्वतःतही सात्त्विकता वाढवणे ४४
* 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'तील शिक्षणाचे टप्पे ४५
* 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'तील विद्यार्थ्यांकडून जन्म-मृत्यूच्या फेर्‍यांतून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल ! ४७
* प्रवेश विनामूल्य * वयाची अट नसणे ४७
* इतर मार्गांनुसार साधना करणार्‍यांनाही साधनेसाठी जागा उपलब्ध करून देणे ४७

**८. शिक्षकांची वैशिष्ट्ये ५०**

**९. हिंदूंचे सर्व धर्मग्रंथ, तसेच ऋषिमुनी आणि संत यांची ग्रंथसंपदा यांवर आधारित असलेला अभ्यासक्रम ५१**

**१०. 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'ची विविध स्तरांनुसार पाठ्यपुस्तके ५१**

**११. परीक्षा आणि पदव्या ५७**

**१२. सामान्य विश्‍वविद्यालय आणि 'अध्यात्म विश्‍वविद्यालय' ६०**

**१३. संशोधन विभाग (Research Division) ६२**

* उद्देश ६२
* वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन ६२
* जगताचे स्थूल ज्ञान संशोधनाद्वारे होत असले, तरी त्याचे सूक्ष्म ज्ञान होण्यासाठी आध्यात्मिक प्रगती होणे आवश्यक ! ६४

**१४. अद्वितीय आध्यात्मिक संग्रहालय ६५**

**१५. 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'चे पृथ्वीवरील सूक्ष्मातील परिणाम ६६**

**१६. 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'च्या उभारणीसाठी साहाय्य हवे ! ६७**

**१७. 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'साठी दान हा धर्मकार्यातील सहभाग ! ६७**

* **परिशिष्ट १** : 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'ने वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेल्या संशोधनाची सूची ६९
* **परिशिष्ट २** : 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'ने वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेल्या; पण अहवाल सिद्ध न झालेल्या चाचण्यांची सूची ७२
* **परिशिष्ट ३** : मानवजातीच्या कल्याणासाठी बुद्धीअगम्य घटनांचे संशोधन आवश्यक व त्याच्या साहाय्यासाठी वैज्ञानिकांना आवाहन ! ७७
* **परिशिष्ट ४** : 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'तील आध्यात्मिक संग्रहालयासाठी संग्रह केलेल्या वस्तूंची सूची ८३

* **परिशिष्ट ५** : सनातनची अनमोल ग्रंथसंपदा ९१
* **प्रस्तूत ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील चित्राच्या संकल्पनेविषयीचे ज्ञान ९५**

# मनोगत

प्राचीन काळापासून गेल्या सहस्र वर्षांच्या आधीपर्यंत भारत देश 'विश्‍वविद्यालयांची भूमी' म्हणून परिचित होता. त्या काळी ऋषिमुनींच्या आश्रमांतून आणि पुढे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, भोजशाळा यांसारख्या विद्यापिठांतून वेद, शास्त्रे, विद्या, कला, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींच्या शिकवणीद्वारे हिंदु धर्म अन् संस्कृती यांचा सार्थ प्रसार होत होता. मुसलमान, इंग्रज यांसारख्या परकियांच्या विध्वंसक आक्रमणांनंतर मंदावलेली ही धर्मज्ञानाची ज्योत पुन्हा चेतवण्यासाठी 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'ची उभारणी केली जात आहे. 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'कडून केवळ विद्यार्थी-साधकांची आध्यात्मिक प्रगती करून घेणे, एवढेच आध्यात्मिक कार्य अभिप्रेत नसेल, तर राष्ट्ररक्षणासाठी आवश्यक असलेले आध्यात्मिक कार्य केले जाईल. हे कार्य साधारणतः पुढील प्रकारचे असेल.

**१. ईश्‍वरप्राप्तीचे शिक्षण देणे** : आज भारतातच नव्हे, तर जगातील शेकडो विद्यापिठांमधून केवळ भौतिकवादावर आधारित शिक्षण दिले जाते. सर्वव्यापी अध्यात्मशास्त्राचे, तसेच ईश्‍वरप्राप्तीसाठीचे शिक्षण देणारी एकही शिक्षणसंस्था सध्या अस्तित्वात नाही. ही उणीव या 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'च्या माध्यमातून दूर करण्याचा प्रयत्न आहे.

**२. ब्राह्मतेजासह क्षात्रतेजाची उपासनाही शिकवणे** : अरब, इंग्रज, पोर्तुगीज इत्यादी परकियांनी अनेक आक्रमणे करून हिंदुस्थानच्या पवित्र भूमीला आणि हिंदूंना विदीर्ण केले. या इतिहासाची पुनरावृत्ती होऊ न देण्यासाठी 'अध्यात्म विश्‍वविद्यालया'त ब्राह्मतेजासह क्षात्रतेजाची उपासनाही शिकवली जाईल. त्यासाठी धर्म, अध्यात्म, साधना इत्यादींविषयी शिक्षण देऊन ब्राह्मतेज वाढवले जाईल, तसेच धर्माभिमान, राष्ट्रभक्ती, वीरवृत्ती इत्यादी वाढवण्याविषयीचे शिक्षण देऊन क्षात्रतेजाचेही वर्धन केले जाईल.

**३. 'हिंदु राष्ट्रा'ला आध्यात्मिक पाठबळ पुरवणे** : सद्यस्थितीत भारत देश आतंकवाद, भ्रष्टाचार, अनारोग्य, कुपोषण, भ्रूणहत्या, जातीवाद, दंगली, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, गोहत्या, धर्मांतर यांसारख्या अनेक संकटांना सामोरे जात आहे. या सर्व संकटांवरील एकमेव उपाय म्हणजे धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेचा त्याग करून रामराज्याची अनुभूती देणारे धर्माधिष्ठित 'हिंदु राष्ट्र' स्थापन करणे. ईश्‍वरी कृपा, संतांचे संकल्परूपी आशीर्वाद, तसेच हिंदुत्ववादी आणि राष्ट्रभक्त यांनी केलेले अथक प्रयत्न यांमुळे वर्ष २०२३ ते २०२५ या कालखंडात भारतात 'हिंदु राष्ट्र' स्थापन

होईल. राजसत्तेला धर्मसत्तेचे पाठबळ असेल, तरच राजसत्ता टिकते. ‘हिंदु राष्ट्र’ समर्थपणे सहस्रो वर्षे टिकण्यासाठी त्याला धर्मसत्तेला पूरक असे संत आणि साधक यांचे आध्यात्मिक पाठबळ पुरवण्याचे कार्य ‘अध्यात्म विश्वविद्यालय’ करील.

असे बहुमोल आणि अद्वितीय कार्य असणाऱ्या संकल्पित ‘अध्यात्म विश्वविद्यालया’चा कार्यपरिचय अन् वैशिष्ट्ये सांगणे, हा या ग्रंथाचे प्रकाशन करण्यामागील उद्देश आहे. हा ग्रंथ वाचल्यानंतर ‘अध्यात्म विश्वविद्यालया’च्या उभारणीत योगदान देण्याची किंवा त्यात साधनेचे शिक्षण घेण्याची प्रेरणा मिळाल्यास या ग्रंथाचे प्रयोजन सफल झाले, असे म्हणता येईल.

ऋषिमुनींमुळे मानवजातीला ज्ञान प्राप्त झाले आहे. यासाठी त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो. माझे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी मला सांगितलेली ‘अध्यात्म विश्वविद्यालया’ची संकल्पना लवकर कृतीत येवो, ही त्यांच्या आणि भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना ! - **संकलक**